गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ●अंक ४१ वा ● गुरुवार २७ जून २०२४ ● पाने ४ ●किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 41 | Date : 27/06/2024 blow Thursday Page 4 Price 4

मंत्रिमंडळ बैठकीतील मोठे निर्णय

विधवा महिलांना वारसा प्रमाणपत्रासाठी ७५ हजारांऐवजी फक्त १० हजार रुपयांचे शुल्क

मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज

पतीच्या मृत्यपश्र्चात महिलांना त्यांच्या मिळकतीवर वारस म्हणून नोंद करण्यासाठी दिवाणी न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्यासाठी आकारण्यात येणारे ७५ हजार रुपयांचे शुल्क कमी करून १० हजार रुपये करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. पतीच्या मृत्यूनंतर विधवा महिलांना बऱ्याच वेळा आर्थिक उत्पन्नाचे पुरेसे साधन राहत नाही. त्यामुळे कोर्ट फी शुल्काची रक्कम व वकील फी यामुळे अनेकवेळा मिळकतीवर वारस म्हणून नाव नोंद करणे राहून जाते. भविष्यात मिळकतीचे कौटुंबिक वाद उद्भवल्यास या महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यात आर्थिक समस्या ही प्रमुख बाब आहे.

सधन कुटुंबातील महिलांनाही अनेकदा आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. शासन विधवा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवित आहे. विधवा महिलांना होणाऱ्या त्रासाच्या तुलनेत । **पान २ वर**

पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून ५ कोटीच्या निधीस प्रशासकीय मान्यता

*पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने मराठा समाजासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवन कामाची निविदा प्रसिद्ध

सोलापूर/दैनिक यशसिध्दी न्यूज

कार्तिकी वारी २०२३ मध्ये श्री विठ्ठलाची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री महोदय यांना करण्यास सकल मराठा समाजाने विरोध केला होता व त्यासाठी पंढरपूर येथे मराठा समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सकल मराठा समाजाच्या आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली व पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्याची आंदोलनकर्त्यांची मागणी त्यांनी मान्य केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्यासाठी पाच कोटीच्या निधीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अत्यंत तत्परतेने प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पंढरपूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी दिलेल्या ५ कोटी ५ लाख २१ हजार ७०४ रुपयांच्या निधीतून पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने कामाची निविदाही प्रसिद्ध केलेली आहे. परंतु पंढरपूर शहरात मराठा समाजासाठी सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी जी जागा उपलब्ध झालेली आहे त्या जागेवर पार्किंगचे आरक्षण असल्याने ते आरक्षण काढण्याबाबत जिल्हा प्रशासनाने नगर विकास विभागाला कळविलेले आहे. तसेच हे आरक्षण काढण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने पाठपुरावा सुरू असून पुढील आठ ते दहा दिवसात हे आरक्षण काढले जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे.

लकरच पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने पंढरपूर शहरातील सर्वे नंबर १४२ अंतर्गत संत गजानन महाराज । **पान २ वर**

राष्ट्रीय समाज पक्ष येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढविणार

अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज : सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी महायुती तसेच महाविकास आघाडी कडून जोरदार तयारी सुरू केली असून महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रीय समाज पक्ष महाराष्ट्र राज्यातील १०४ विधानसभा मतदारसंघात स्वतंत्र उमेदवार उभे करणार असल्याची माहिती पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांनी दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, पंढरपूर - मंगळवेढा, माळशिरस, सांगोला, मोहोळ, करमाळा, माढा या मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर लढण्याची सुचना पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे. त्यामुळे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली असून. त्याचा अहवाल पक्षश्रेष्ठींकडे पाठविण्यात येणार आहे. अक्कलकोट तालुक्यात राष्ट्रीय समाज पक्ष तसेच महादेव जानकर यांना मानणारा मोठा वर्ग आहे. स्वबळावर लढण्याच्या निर्णयामुळे अक्कलकोट

राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ शेवते यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधले असता त्यांनी सांगितले की महाराष्ट्र राज्यातील १०४ विधानसभा मतदारसंघात स्वतंत्र पणे उमेदवार उभे करणार असल्याची माहिती दिली. सध्या तरी महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्या बरोबर कोणत्याही प्रकारची चर्चा झाली नसल्याची माहिती दिली.

विधानसभा निवडणुकीत रंगतदार लढत होणार ही चर्चा सुरू झाली आहे. पक्षश्रेष्ठीचा आदेश आल्यास अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात ताकदीनिशी लढविणार असून अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत कोणता उमेदवार राष्ट्रीय समाज पक्षातर्फे निवडणूक लढविणार याची उत्सुकता लागली आहे.

कालच्या परभणी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेवजी जानकर यांचा झालेला पराभव जिव्हारी लागला आहे. कार्यकर्त्यांकडून आगामी विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढविण्याची मागणी करीत आहेत.

भाजप खासदार ओम बिर्ला १८ व्या लोकसभेचे अध्यक्ष

काँग्रेसला उपाध्यक्षपद मिळणार का?

नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज

१८ व्या लोकसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा ओम बिर्ला यांची निवड करण्यात आली आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी यासंदर्भातील घोषणा केली. आवाजी मतदानाने ही निवड करण्यात आली.भाजपचे उमेदवार ओम बिर्ला यांची लोकसभा अध्यक्षपदी पुन्हा एकदा निवड झाली आहे. सत्ताधारी आघाडीच्या बाजूने संख्याबळ असल्याने एनडीएचे उमेदवार अध्यक्षपद राखू शकले. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर ओम बिर्ला यांचे पंतप्रधान मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अभिनंदन केले. मोदी आणि गांधींनी अध्यक्षपदांना त्यांच्या खुर्चीपर्यंत सोबत केली आणि त्यांच्या साक्षीने ओम बिर्ला यांनी खूर्ची स्वीकारली. बिर्ला यांचा गेल्या टर्ममध्ये अध्यक्ष होण्याचा अनुभव त्यांना देशाला आणखी मार्गदर्शन करण्यास मदत करेल, असे पंतप्रधान मोदी यांनी आज सांगितले. दरम्यान, काल (२५ जून) संध्याकाळी सत्ताधारी पक्ष आणि विरोधक एकमत होऊ न शकल्याने त्यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला होता. इंडिया आघाडीच्या वतीने के.सुरेश यांनी अर्ज केला होता.

लोकसभाध्यक्षांची नियुक्ती बिनविरोध करण्यासाठी भाजपच्या वतीने संरक्षणमंत्री राजनाथ सिंह व संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांच्यावर विरोधकांशी बोलणी करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. राजनाथ सिंह यांनी इंडिया आघाडीतील घटक पक्षांशी सोमवारीपासून फोनवरून संपर्क केला होता व सहमतीने लोकसभाध्यक्षांची निवड करण्याची विनंती केली होती. राजनाथ सिंह यांच्या प्रस्तावावर काँग्रेससह इंडियातील घटक पक्षांनी सहमतीही दाखवली होती. मात्र उपाध्यक्षपदाच्या मुद्द्यावर ही बोलणी फिस्कटली.

लोकसभाध्यक्षपदाची निवड बिनविरोध होईल त्यासाठी काँग्रेससह विरोधी पक्ष भाजपाच्या उमेदवाराला पाठिंबा देतील, असे निश्र्चित झाले होते. पण लोकसभेचे उपाध्यक्षपद काँग्रेसला दिले जावे, अशी मागणी काँग्रेसचे संघटना महासचिव व खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी केली. वास्तविक, उपाध्यक्षपद काँग्रेसला देण्याची तयारीही भाजपाने दाखवली होती. मात्र, तसे उघड आश्र्वासन देण्यास भाजपाने नकार दिला. विरोधकांचे म्हणणे मान्य केले जाऊ शकते, पण विरोधकांनी अटी घालू नये, असे भाजपाचे म्हणणे होते. पण वेणुगोपाल यांनी तडजोड करण्यास नकार दिल्याने भाजपा व काँग्रेसमधील बोलणी अपयशी ठरली. दरम्यान, आता अध्यक्षपद भाजपाकडे गेल्याने उपाध्यक्षपद काँग्रेसला मिळणार का, हे पाहणं महत्त्वाचं आहे.आम्हाला विश्र्वास आहे की विरोधी पक्षाला बोलण्याची परवानगी देऊन, आम्हाला भारतातील लोकांचे प्रतिनिधित्व करण्याची परवानगी देऊन, तुम्ही भारतीय राज्यघटनेचे रक्षण करण्याचे तुमचे कर्तव्य पार पाडाल. मी पुन्हा एकदा तुमचे आणि सर्व सदस्यांचे अभिनंदन करू इच्छितो, असं म्हणत राहुल गांधी यांनी ओम बिर्ला यांचे अभिनंदन केले.



लोकसभेच्या आतापर्यंतच्या अध्यक्षांची यादी

✻ लोकसभेचे पहिले अध्यक्ष गणेश वासुदेव मावळणकर होते. गणेश वासुदेव मावळणकर यांनी १५ मे १९५२ ते २७ फेब्रुवारी १९५६ या कालावधीत अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते.

✻ लोकसभेचे दुसरे अध्यक्ष एम.ए.अय्यंगार हे होते. त्यांनी ८ मार्च १९५६ ते १० मे १९५७ या कालावधीत आणि ११ मे १९५७ ते १६ एप्रिल १९६२ या कालावधीत अध्यक्ष म्हणून काम पाहिलं.

✻ लोकसभेचे तिसरे अध्यक्ष म्हणून सरदार हुकम सिंग होते. त्यांनी १७ एप्रिल १९६२ ते १६ मार्च १९६७ या कालावधीत लोकसभेचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते.

✻ लोकसभेचे चौथे अध्यक्ष म्हणून नीलम संजीव रेड्डी होते. त्यांनी १७ मार्च १९६७ ते १९ जुलै १९७१ । **पान २ वर**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून पंढरपूर येथील कृषी सेवा केंद्रांना भेटी

✻ कृषी सेवा केंद्रातील बी बियाण्याच्या नोंदी, खरेदी विक्री नोंदी, विक्री परवाने, मुदत बाह्य निविष्ठा तपासणी आदी बाबींची सखोल चौकशी केली ✻ कृषी विभागाने शेतकऱ्यांची कृषी सेवा केंद्राकडून कोणत्याही प्रकारची फसवणूक होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश ✻ शेतकऱ्यांनी निविष्ठाच्या अनुषंगाने १८००२३३४००० या टोल फ्री क्रमांकावर तक्रारी करण्याचे आवाहन

पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज : यावर्षी जिल्ह्यात पावसाने दमदार सुरुवात केलेली असून शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला लागलेला आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कृषी सेवा केंद्राकडून बी-बियाणे, खते याविषयी कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यासाठी पंढरपूर येथील काही कृषी सेवा केंद्रांना अचानकपणे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रत्यक्ष भेट देऊन त्या कृषी सेवा केंद्रातील विविध प्रकारचे विक्री परवाने, बी बियाण्यांच्या नोंदी, खरेदी विक्री पावत्या, मुदत बाह्य निविष्ठा आहेत का? याची प्रत्यक्ष पाहणी केली. कृषी सेवा केंद्रांनी शेतकऱ्यांची कोणत्याही पद्धतीने जर फसवणूक केली तर त्यांच्यावर विहित शासकीय नियमावली प्रमाणे अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल असे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, तालुका कृषी अधिकारी सुर्यकांत मोरे, कृषी अधिकारी पंचायत समिती विकास काळुंखे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पंढरपूर मधील मे. प्रेरणा बीज भंडार व मे फुलचंद रामचंद गांधी या कृषी सेवा केंद्रांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी विक्री परवाने, बियाणे व खत यांची खरेदी बिले, साठा पुस्तक, दर फलक, भाव फलक, टोल फ्री क्रमांक, मुदतबाह्या निविष्ठा, तसेच बियाणे व खत यांचे बॅग अथवा पिशवीवर कोणती माहिती छापलेली असते इत्यादी बाबत माहिती जाणून घेतली.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी विक्रेत्यांनी । **पान २ वर**

छत्रपती शाहु महाराज जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती कडून लाडू वाटप

दैनिक यशसिध्दि न्यूज

अक्कलकोट/प्रतिनिधीः सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, आरक्षणाचे जनक, सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ, लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमीत्त गोगांव येथे विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती आणि सिद्धार्थ सोशल फाउंडेशन यांच्या वतीने लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमीत्त जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे विद्यार्थीना लाडू वाटप करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, माजी सरपंच अंकुश जगताप, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य नामदेव बनसोडे, खाजपा गायकवाड, मुख्याध्यापक दयानंद चोळे पुडलिक वाघमारे, शंकर कारभारी ज्योती आलूरे यासह मान्यवर उपस्थित होते.

संपादकीय

संवेदना गोठल्याचे निदर्शक..

वसईत घडलेली घटना तर माणुसकीला शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. सहा वर्षे जिच्यावर जिवापाड प्रेम केले, तिच्याच डोक्यात पान्याचे घाव घालताना प्रियकराचा हात थरथरला नाही. पोलीस तपास होईल, त्यामागचे निश्चित कारणही समोर येईल. पण अनावर झालेल्या रागाने एका निष्पाप तरुणीचा बळी घेतला त्याचे काय? संबंधांमध्ये वितुष्ट जरी आले तरी, ते सामंजस्याने किंवा दुसऱ्या एखाद्या जबाबदार व्यक्तीच्या मध्यस्थीने त्यातून मार्ग काढता येऊ शकतो, असा विचार तो करू शकला नाही, हे खेदजनक आहे. गैरसमज आणि संशय हे दोन व्यक्तींमधील संबंधाचे मोठे शत्रू असतात, ते दबा धरून बसलेले असतात, त्यांच्यापासून दोघांनी फार सावध राहावे लागते. अव्यक्त प्रेम आणि अतिरेकी प्रेम याचा शेवट असा भयावह होऊ शकतो, याचा प्रत्यय अनेकदा आला आहे. वसई पूर्वेच्या वालीव येथे आरती यादव या २२ वर्षीय तरुणीची २९ वर्षीय रोहित यादव याने भर रस्त्यात केलेली हत्या अतिरेकी प्रेमाचे स्पष्ट उदाहरण आहे. साधारणपणे दोन वर्षांपूर्वी नवी दिल्लीत श्रध्दा वालकर हिची हत्या असो वा गेल्यावर्षी मीरा रोड येथील सरस्वती वैद्य हिची हत्या असो, या घटनाही त्याच पठडीतील आहेत. आपल्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, याची पुसटशीही कल्पना श्रध्दा, सरस्वती आणि आरती यांना आली नसावी का? तसे संकेत मिळाले असतील तर, मग त्या सावध का झाल्या नाहीत? या नाण्याची दुसरी बाजू ही की, आता नकार पचविणेसुध्दा जड होत चालले आहे. मुलीकडून नकार येताच, पुरुषी अहंकार जागा होतो आणि त्याचे पर्यवसान गंभीर गुन्ह्यातच होते. कल्याणमध्ये एका २५ वर्षीय तरुणाने एकतर्फी प्रेमातून बारा वर्षीय मुलीची हत्या केली. सर्वात गंभीर म्हणजे, त्याने मुलीच्या आईसमोरच तिच्यावर चाकूने सात ते आठ वार केले. या सर्व घटनांचा मथितार्थ एकच आहे तो म्हणजे, मानवी संवेदना बोथट होत चालल्या आहेत. पृथ्वीतलावरील सर्व प्राण्यांमध्ये मनुष्यप्राणी श्रेष्ठ गणला जात असला तरी, त्याच्या या कृती पशुत्वापेक्षाही हीन आहेत. आरती हिच्या हत्येच्या वेळी आजूबाजूला लोक होते. त्यातल्या अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. वसईत डोळ्यादेखत गुन्हा घडत असताना एकाही व्यक्तीचे रक्त उसळले नाही, हे संवेदना गोठल्याचे निदर्शक आहे.

पान १ वरुन

लोकसभेच्या आतापर्यंतच्या अध्यक्षांची

या कालावधीत ते लोकसभेचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते.

✻ लोकसभेचे पाचवे अध्यक्ष म्हणून गुरदयाल सिंग ढिल्लन हे ८ ऑगस्ट १९६९ ते १९ मार्च १९७१ पर्यंत लोकसभेचे अध्यक्ष होते. तसेच २२ मार्च १९७१ ते १ डिसेंबर १९७५ या काळातही त्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिलं.

✻ लोकसभेचे सहावे अध्यक्ष बळीराम भगत होते. त्यांनी १५ जानेवारी १९७६ ते २५ मार्च १९७७ या कालावधीत लोकसभेचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते.

✻ लोकसभेचे सातवे अध्यक्ष म्हणून नीलम संजीव रेड्डी हे होते. त्यांनी २६ मार्च १९७७ ते १३ जुलै १९७७ या कालावधीत ते लोकसभेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

✻ लोकसभेचे आठवे अध्यक्ष के.एस.हेगडे होते. त्यांनी २१ जुलै १९७७ ते २१ जानेवारी १९८० या कालावधीत लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं.

✻ लोकसभेचे नववे अध्यक्ष म्हणून बलराम जाखड होते. त्यांनी २२ जानेवारी १९८० ते १५ जानेवारी १९८५ या दरम्यान कामकाज पाहिलं. पुन्हा १६ जानेवारी १९८५ ते १८ डिसेंबर १९८९ पर्यंत अध्यक्ष म्हणून कामकाज पाहिलं.

✻ लोकसभेचे १० वे अध्यक्ष रबी राय होते. ते १९ डिसेंबर १९८९ ते ९ जुलै १९९१ या कालावधीत ते अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

✻ लोकसभेचे ११ वे अध्यक्ष शिवराज पाटील हे होते. त्यांनी १० जुलै १९९१ ते २२ मे १९९६ या कालावधीत लोकसभेचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते.

✻ लोकसभेचे १२ वे अध्यक्ष पी.ए संगमा होते. त्यांनी हे २३ मे १९९६ ते २३ मार्च १९९८ या कालावधीत लोकसभेच्या अध्यक्ष म्हणून काम पाहिलं.

✻ जी एम सी बालयोगी हे लोकसभेचे १२ वे अध्यक्ष होते. त्यांनी २४ मार्च १९९८ ते १९ ऑक्टोबर १९९९ या दरम्यान काम पाहिलं. त्यानंतर ते २२ ऑक्टोबर १९९९ ते ३ मार्च २००२ पर्यंत कार्यरत होते.

✻ लोकसभेचे १३ वे अध्यक्ष मनोहर जोशी होते. त्यांनी १० मे २००२ ते २ जून २००४ या कालावधीत लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं.

✻ लोकसभेचे १४ वे अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी हे होते. त्यांनी ४ जून २००४ ते ३० मे २००९ या कालावधीत लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिलं.

✻ लोकसभेचे १५ वे अध्यक्षा मीरा कुमार या होत्या. त्यांनी ३० मे २००९ ते ४ जून २०१४ या कालावधीत त्या लोकसभेच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या.

✻ लोकसभेच्या १६ व्या अध्यक्षा सुमित्रा महाजन या होत्या. ६ जून २०१४ ते १६ जून २०१९ या कालावधीत सुमित्रा महाजन यांनी लोकसभेच्या अध्यक्षा म्हणून काम पाहिलं.

✻ लोकसभेचे १७ वे अध्यक्ष म्हणून ओम बिर्ला यांनी काम पाहिले. त्यानंतर पुन्हा एकदा १८ व्या लोकसभेच्या अध्यक्षपदी ओम बिर्ला यांची निवड झाली.

माणसासाठी लढणारा राजा माणूस “राजर्षी शाहु महाराज”

राजा असुनही लोकशाहीमध्येही लोकांच्या मनावर राज्य करून लोकांना आजही विचाराच्या व कार्याच्या माध्यमातून जागृत करणारे व्यक्तीमत्व म्हणजे राजर्षी शाहु महाराज होत. राजर्षी शाहु महाराज यांचे कार्य, विचार हे शब्दांत व्यक्त करणे शक्यच नाही. हिमालयापेक्षा उंच आणि महासागरा प्रमाणे विशाल असे कर्तृत्व राजर्षी शाहु महाराज यांचे आहे. स्वतः राजा असुनही सर्वसामान्य जनतेच्या उद्धाराचा विचार करून सर्वसामान्य जनतेच्या उद्धारासाठी झटणारा राजा माणूस म्हणजे राजर्षी शाहु महाराज होत. राजर्षी शाहु महाराज यांचे कार्य व विचार राजेशाहीचे नव्हते तर लोकशाहीचे होते. स्वतः राजा असूनही लोकांना हक्क अधिकारां बाबत जागृत करून हक्क अधिकारासाठी बंड करून उठायला पाहिजे हे त्यांची शिकवण. आज लोकशाही आहे, लोकशाही मध्ये लोकांचे प्रतिनिधी असुनही लोकांच्या समस्या सुटत नाहीत, लोकांना लोकांचे हक्क अधिकार व शासकीय योजना ही माहिती होत नाहीत कारण आताच्या लोकप्रतिनिधींनी लोकांना अंधारात ठेऊन त्यांच्या नावाने मलिदा खाण्याचे काम सुरू केले आहे. राजर्षी शाहु महाराज यांची जयंती साजरी करताना आपल्या त्यांचे कार्य व विचार आणि आजची परिस्थिती याचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. जर राजर्षी शाहु महाराज यांच्या विचारावर आधारित समाज व्यवस्था आज असेल तर खुप आनंदाची गोष्ट असून राजर्षी शाहु महाराज यांना वंदन करताना स्वाभिमान जागृत होईल. परंतु राजर्षी शाहु महाराज यांच्या विचार व कार्यावर जर आजची समाज व्यवस्था नसेल तर राजर्षी शाहु महाराज यांचे विचार व कार्य समाजात पेरण्याची नितांत आवश्यकता आहे. जोपर्यंत आपण त्यांचे विचार व कार्य समाजात पेरणार नाही तोपर्यंत राजर्षी शाहु महाराज यांना अभिवादन करण्याचे सार्थक होणार नाही. राजर्षी शाहू महाराज यांचे काम मुख्यत्वे शिक्षण, समता, सत्ता, उद्योग व अंधविश्र्वास निर्मुलन शी संबधित होते. राजर्षी शाहु महाराजांचे स्पष्ट मत होते कि शिक्षणाशिवाय स्वातंत्र्याचा फायदा नाही. कारण लोकांना शिक्षणच नसेल, लोक जागृतच नसतील तर लोकांना स्वांतत्र्याचा अर्थच कळणार नाही. म्हणून प्रत्येकाने शिक्षणावर भर द्यायला पाहिजे. लोकांनी शिक्षण घ्यायला पाहिजे असे फक्त ते सांगत नव्हते तर स्वतः च्या संस्थानात सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण घेता येईल याची सोय केली. त्यांच्या राहण्या आणि खाण्यापिण्याची सोय व्हावी म्हणून बोर्डींग सुरू केले. कोल्हापूर ला बोर्डींग चे माहेर समजले जायचे. प्रत्येकाला शिक्षण सक्तीचे करून जे पालक मुलांना शिक्षणासाठी पाठवणार नाहीत त्यांच्या वर दंड आकारून त्यांना शिक्षा केली जात असे. आजचा आपण विचार केला तर मोफत असलेले शिकणाचे बाजारीकरण केल्या जात आहे. गुणवत्ते विषयी तर सर्वांनाच माहिती आहे. गोरगरिबांना शिक्षण मिळुच नये अशी व्यवस्था निर्माण करून सर्व सामान्य लोकांना आजही शिक्षणापासून दुर केले जात आहे. राजर्षी शाहु महाराज राजा अजून जनतेला शिक्षण देत होते, आज जनतेने प्रतिनिधी असुन जनतेचे शिक्षण बंद करण्याचे कट कारस्थान करत आहेत. लोक शिक्षणाची मागणी करून ही लोकशाही मध्ये त्यावर लक्ष दिले जात नाही हि खूप गंभीर बाब आहे. दुसरी गोष्ट म्हणजे समता. राजा ने देशात समता प्रस्थापित व्हावी यासाठी कार्य केले, संविधानाने समता प्रस्थापित करून दिली तरीही आजचे लोक समता प्रस्थापित करू इच्छित नाहीत. राजर्षी शाहु महाराज यांचा ठाम विश्र्वास होता की जाती संबधीत लोक जोपर्यंत असतील तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. म्हणून लोकांनी जातीमोडीत काढून जागृत होऊन एकत्र आले तर खऱ्या अर्थाने देशहित साध्य होईल. परंतु सध्या लोकांना जातीजातीमध्ये लढवून देशात अशांतता निर्माण करून राजकीय झोळी जातीच्या नावावर भरली जाते. हि खुप मोठी शोकांतिका आहे. जेथे जात नष्ट करण्यासाठी महापुरुष होऊन गेले तेथे जाती बळकट करण्याचे काम होत असेल तर महापुरुषांचे विचार आहेत कुठे हा प्रश्र्न उभा राहतो. शिक्षण आणि समतेच्या जोरावर मिळालेले स्वातंत्र्य हि टिकणारे स्वातंत्र्य असेल. इंग्रजांकडून सत्ता काढून घेतली आणि अल्पसंख्याक ब्राह्मण लोकांच्या हाती सत्ता गेली तर पुन्हा पेशवाई आल्याशिवाय राहणार नाही हे राजर्षी शाहु महाराज यांचे भाकीत आज सत्य होताना दिसत आहे. बहुजन समाजातील प्रतिनिधी आजही गुलामी पत्कारताना दिसत आहेत. आजही ते सत्ते पासून दुर आहेत. जर सत्तेत अल्पसंख्याक बसलेले असतील तर ते बहुजनांचा उद्धार करू शकणार नाहीत. त्यासाठी बहुजन समाजातील लोक सत्तेत पाहिजे. आणि बहुजन समाजाच्या हाती सत्ता यायची असेल तर जातीबंधनाला तोडून एक होणे आवश्यक आहे. पुर्वी पासून ज्यांना शिक्षण, हक्क, समता नाकारली त्यांच्या च हातात सत्ता गेली तर बहुजनांचा विकास कसा होईल असा सार राजर्षी शाहु महाराज यांच्या कार्य व विचारातून दिसून येतो. शिक्षण आणि सत्ते सोबतच आपल्याला उद्योजक होणे खूप गरजेचे आहे. शाहु महाराज म्हणतात फक्त सैनिक होऊन आमच्या समस्या सुटणार नाहीत तर आमची चळवळ यशस्वी करायची असेल तर आपले मोठमोठे व्यवसाय पाहिजे. परंतु आज परिस्थिती बघितली तर आजही बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची बोळवण चतुर्थ श्रेणीच्या वर्गात करून नोकरी चे गाजर दाखवले जाते. आता तेही जवळपास बंद झाल्यासारखे आहे. ज्या नोकऱ्या मोक्याच्या किंवा न्यायाच्या आहेत तेथे बहुजन समाजाचा टक्का खुपच कमी आहे. आजही मोठ मोठे उद्योग हे विशिष्ट लोकांच्या हातीच आहेत. जातीय विषमतेमध्ये कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही एका जातीची मक्तेदारी नसायला पाहिजे. एका जातीची मक्तेदारी ही विषमता दृढ करत असते. देशामध्ये सध्या जातीय तेढ निर्माण करुन माणसाच्या समस्या वाढवल्या जात आहेत. परंतु जाती धर्माच्या विषयी जास्त भावनिक बनवल्याने लोकांना शिक्षण व रोजगार जवळपास नष्ट होत याची जाणीव राहली नाही. राजर्षी शाहु महाराज यांनी राजा असून रोजगार संधी निर्माण करून दिली होती. आज लोकशाही असूनही लोक अल्पसंख्याक असलेल्या आणि समतावादी विचार नसलेल्या निच प्रवृतीचे समर्थन करतात. लोककल्याणावर लक्षच दिले जात नाही. कोणत्याही कामामध्ये लोकप्रतिनिधी चा टक्का ठरलेला असल्याने काम पुर्ण होण्याअगोदर च कामाचा दर्जा दिसुन येत आहे. अनेक पुल करोडो रुपये खर्च करून बांधले ते एका वर्षात पडले, वंदे भारत रेल्वे आणली त्यामध्ये धबधबे तयार झाले आणि जुन्या रेल्वेच्या इंजिन ने वंदे भारत चालत आहे. म्हणजे गाडीचे इंजिनही दर्जेदार बनवले जात नसेल तर किती विकास झाला असेल? भोलेनाथ मुर्ती पहिल्या च पावसात पडून जातात, मंदिरातील सोन्याचे पितळ होते, समृद्धी महामार्गावर खड्डे पडतात, अटलसेतु रस्ता लगेच तडकतो, अयोध्या राम मंदिर गळते या कामावर हजारो करोडो रुपये खर्च होऊनही निकृष्ट दर्जाचे काम होत असेल तर सर्व सामान्य जनतेच्या जिवाशी खेळणे आणि देशाला लुटण्याचा धंदा जोरात सुरू आहे. तेरा लाख लोकसंख्या असलेल्या संस्थानात सुरवातीला दरमहा दोनशे नंतर दरमहा तिनशे सैनिक भरती करून रोजगार उपलब्ध करण्याचे नियोजन करून आर्थिक संपन्न करण्याचा प्रयत्न केला. अडाणी आणि भोंदू लोकांना धार्मिक समजून प्रचंड प्रमाणात अंधविश्र्वास व थोतांड पसरवण्याचा प्रयत्न केला जातो. महिलांवर बलात्कार करणाऱ्या लोकांना पुजनिय मानले जाते. तर लोककल्याणासाठी आयुष्य खर्ची केलेल्या महापुरुषांना जातीत बंदिस्त करून त्यांच्या प्रतिमेची विटंबना केली जाते. आजही सत्ता, शिक्षण आणि मोक्याच्या जागा तसेच उद्योग विशिष्ट लोकांच्या हाती असल्याने आर्थिक व सामाजिक विषमता कायम आहे. लोकांचे विभाजन करण्यासाठी जातीधर्माचा आधार घेऊन सामाजिक विषमता पसरवून जात मजबूत केली जात असेल तर राजर्षी शाहु महाराज यांना अभिवादन करण्याचा नैतिक अधिकार आपल्याला आहे का? राजर्षी शाहु महाराज यांच्या मते ब्रिटिश आज ना उद्या देश सोडून जातील परंतु आपण शिक्षीत होणे आवश्यक आहे तरच देशाची धुरा आपण सांभळू शकतो. म्हणजेच देशाचे शत्रु किंवा देशाचे नुकसान इंग्रजांपेक्षा येथील अनिष्ट रुढी परंपरा, सामाजिक व्यवस्था व अंधविश्र्वास आणि पाखंडाने केले. म्हणून राजर्षी शाहु महाराज शिक्षणावर भर देऊन अंधविश्र्वास, पाखंड तोंडात नष्ट करण्याची शिकवण दिली. परंतु सत्ताधारी लोक राजर्षी शाहु महाराज यांच्या विचाराचे नसल्याने शाहु महाराज यांनी सुरू केलेले शिक्षण, होस्टेज आरक्षण बंद करून जे शाहु महाराज यांनी बंद केले होते ते थोतांड, पाखंड आणि अंधविश्र्वास याला खत पाणी घालून जातीय लढा मजबूत करत आहेत. जातीय द्वेष आणि लढ्याकडे लोकांचे लक्ष विचलित केल्याने शिक्षण, आरोग्य, रोजगार ह्या समस्या आहेत याचा विसरच लोकांना पडला. राजर्षी शाहु महाराज राजा असुनही सर्वांना समान न्यायाची व्यवस्था केली होती. आज न्यायालये असुनही सर्वसामान्य लोकांना न्याय कशाप्रकारे मिळतो, सर्व सामान्य लोकांवर अन्याय होऊन विशिष्ट जातीच्या लोकांना कसे न्याय दिले जातात हे सर्वश्रुत असुन माणुसकीला व नैतिकतेला काळीमा फासणारे आहे. आज लोकशाही असुनही लोकशाहीचा चुकीच्या पद्धतीने वापर करून लोकांना हक्क अधिकार व मानवी स्वातंत्र्या पासून दुर केले जात आहे. राजर्षी शाहु महाराज या राजांचे मन केवढे असेल जे राजे असुनही माणसाचे हक्क अधिकार आणि शिक्षणासाठी लढत राहिले. लोकांना जागृत करून शत्रुची ओळख करून दिली.

जयंती दिनी राजर्षी शाहु महाराज यांना अभिवादन करताना आपण शिक्षण, रोजगार व हक्क अधिकारा विषयी प्रबोधन करणे आवश्यक आहे. थोतांड, अंधविश्र्वास मातीत गाढून मानवकल्याण व देशहित लक्षात घेऊन आपल्याला शत्रुची ओळख झाली पाहिजे तरच राजर्षी शाहु महाराज यांची जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल. राजर्षी शाहु महाराज जयंती च्या मंगलमय सदिच्छा...

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

विधवा महिलांना वारसा

शासन महसूलाची हानी अल्प प्रमाणात असल्याचे निरीक्षण सर्वच उत्पन्न गटातील महिलांना ही सवलत लागू करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.चंद्रपूर जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान, चंद्रपूर व टाटा न्यास (ट्रस्ट) यांच्या माध्यमातून खाजगी भागीदारी तत्त्वावर चंद्रपूर कॅन्सर केअर फाऊंडेशनच्या माध्यमातून १०० खाटांचे कर्करोग रुग्णालय सुरु करण्यात येत आहे. या फाऊंडेशनला जमीन भाडेपट्टयाच्या करारनाम्यासाठी द्याव्या लागणाऱ्या मुद्रांक शुल्कातून सूट देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्य शासनाचा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि जिल्हा खनिज प्रतिष्ठान, चंद्रपूर व टाटा न्यास (ट्रस्ट) यांच्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या खाजगी भागीदारी तत्त्वावरील १०० खाटांच्या कर्करोग रुग्णालयाकरिता चंद्रपूर कॅन्सर केअर फाऊंडेशन या कंपनीस / संस्थेस मौजे चांदा रै., ता.जि. चंद्रपूर येथील १० एकर जमीन ३० वर्षासाठी नाममात्र रू. १/- प्रतीवर्ष या दराने भुईभाड्याने जमीन उपलब्ध करून दिली आहे. या रुग्णालयामुळे खेड्यातील तसेच शहरातील सर्वसामान्य स्तरातील कर्करोगग्रस्तांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. यठिकाणी केंद्र शासन व राज्य शासनाच्या आरोग्य योजनेच्या दरामध्ये कर्करोग उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्यासह रुग्णासोबतच्या एका व्यक्तीस अत्यल्प दरामध्ये रहिवासी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अटीस अधीन राहून या फाऊंडेशनला दिलेल्या जागेच्या भाडेपट्टा करारनाम्यास मुद्रांक शुल्क भरणा करण्यापासून सूट देण्यास आज मान्यता देण्यात आली.

विरार ते अलिबाग या बहुउद्देशीय वाहतूक मार्गीका प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी २२ हजार २५० कोटी हुडकोकडून कर्जरुपाने घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मागणी केल्यानुसार या कर्जासाठी शासन हमी देण्यात येईल. एकूण ११३० हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावयाचे असून एकूण २१५.८० हेक्टर जमिनीचे भूसंपादन झाले आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी २३४१ कोटी ७१ लाख रुपये निधी देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

खरेदी बिलाप्रमाणे साठा पुस्तकामध्ये बियाणे व खत यांची विक्रेत्यांनी आवक घेतली आहे का याची स्वत: खात्री केली व त्याच्या नोंदी तपासल्या. खरीप हंगामाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना तक्रारी असल्यास त्यांनी कोठे तक्रार करावी याबाबत ही माहिती जाणून घेतली. विक्री केंद्राच्या दर्शनी भागत लावण्यात आलेला महाराष्ट्र शासन, कृषी विभाग टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० हा चालू आहे का याची कॉल करून खात्री करून घेतली. त्यानंतर मुदत बाह्य निविष्ठा बाबत काय कार्यवाही केली जाते हे ही जाणून घेतले. मुदत बाह्य निविष्ठा शेतकऱ्यांना विक्री होणार नाहीत याबाबत योग्य ती दक्षता कृषी विभागाने काटेकोरपणे घ्यावी असेही त्यांनी निर्देशित केले.

बियाणे, खत व किटकनाशक या निविष्ठा बाबत शेतकऱ्यांच्या काही तक्रारी आहेत का? तसेच काही अडचणी आहेत का? हे ही जाणून घेतले. तसेच कृषी विभागाचे अधिकाऱ्यांनी या दोन्हीही कृषी सेवा केंद्राची नियमाप्रमाणे सखोल चौकशी करावी व जिल्ह्यात कोठेही कृषी निविष्ठांची शेतकऱ्यांना टंचाई भासणार नाही याचे काटेकोरपणे नियोजन करावे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

पंढरपूर येथे मराठा भवन बांधण्यासाठी

पिछाडी रस्ता स्टेशन रोड पंढरपूर ही जागा मराठा सांस्कृतिक भवन साठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मराठा समाजासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवन बांधण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रसिद्ध झालेली असून ही प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करून संबंधित एजन्सीला कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहेत. पंढरपूर शहरात सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी आवश्यक असलेली चांगली जागा शोधण्यात खूप वेळ गेला. सकल मराठा समाजाची पंढरपूर शहरात सांस्कृतिक भवन बांधण्याची मागणी मान्य झाल्यानंतर हा समाज अत्यंत सकारात्मक राहून प्रशासनाला सहकार्य केलेले आहे.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

गौतम सदावर्ते यांची शिक्षक पदी नियुक्ती

आरेगांव/दैनिक यशसिध्दि न्यूज : आरेगांव येथील अभ्यासु, हुशार व मेहनती व्यक्तीमत्व असलेले गौतम त्र्यंबक सदावर्ते यांची चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक पदावर नियुक्ती झालेली आहे. स्पर्धेच्या आणि कमी जागेच्या काळातही यश संपादित करणे ही काही साधी गोष्ट नसताना यशस्वी होणे म्हणजे जिवनाची महापरिक्षा पास होणे होय. गौतम सदावर्ते हे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आपले शालेय शिक्षण पुर्ण आर्थिक परिस्थिती ला अडसर न मानता उदरनिर्वाह सोबतच अभ्यासाचा छंद मात्र सोडला नाही. स्वतःला सिद्ध करण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा परिक्षेची सतत तयारी करत असत. स्वतः चा व कुटुबांचा उदरनिर्वाह करून अभ्यासाचा छंद जोपासने वाटते तेवढे सोपे नसताना जिद्द चिकाटी व मेहनती वर गौतम सदावर्ते यांनी अभ्यास सुरुच ठेवला. स्वतः च्या मनाने ठरवले तर कोणतीही अडचण यशाला अडथळा ठरत नाही याचे उत्तम उदाहरण म्हणजे गौमत सदावर्ते आहे. गौतम सदावर्ते यांची नियुक्ती म्हणजे अभ्यास, जिद्द चिकाटी व मेहनतीचे फलीतच आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या विचारसरणीतून राज्याची प्रगती : आ.सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेत आयोजित अभिवादन कार्यक्रम प्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन..

राजर्षी शाहू महाराजांनी समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून आपले अधिकार वापरले. त्यांनी समाजातील सर्व वर्गांना न्याय दिला. त्यांचीच विचारसरणी आज आत्मसात केली जात आहे. त्यामुळे राज्याची प्रगती देखील जलद गतीने होत आहे. असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. हन्नूर रोडवरील महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय, गिरीजामाता प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी यांच्यासाठी कार्य केले. आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. वस्तीगृहाची निर्मिती करून सर्व जाती धर्मातील मुलांना शिक्षणाची द्वारे खुली केली. अस्पृश्य समाजाला सामाजिक न्याय मिळावा म्हणून त्यांनी केलेले प्रयत्न सर्वश्रुत आहे. त्यांची ही कार्यपद्धती अवलंबल्यामुळे खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे.

यावेळी जेष्ठ संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी,सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.खंडेराव घाटगे यांनी केले, तर आभार सुरेश रूगे यांनी मानले.

बहुजन उद्धारकलोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती हन्नुर ग्रामपंचायत च्या वतीने साजरी करण्यात आली प्रतिमेचे पूजन ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर यांच्या हस्ते करण्यात आले. अंगणवाडी सेविका नया बाळशंकर अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर, ज्येष्ठ नागरिक आमीन मुल्ला, महाळप्पा सोनकांबळे, सिद्धाप्पा बंदीछोडे, ग्रामपंचायत कर्मचारी तुळशीराम इरवाडकर, संगणक परिचारक सागर बंदीछोडे आदी उपस्थित होते

रेल्वे विभागात स्वच्छता मोहीम

दैनिक यशसिध्दि न्यूज

सोलापूर/प्रतिनिधीः मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय कार्यालयात स्वच्छता मोहिमेंतर्गत विभागीय व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेंतर्गत कार्यालयातील फाइल नीटनेटके ठेवणे, तीन-चार वर्षांपूर्वीचे जुने फाइलची सॉफ्ट कॉपी तयार करून त्या सर्व जुन्या फाईल स्टोअर रूममध्ये जमा कराव्यात. असे सर्व कर्मचाऱ्यांना निर्देश देण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून रेल्वे विभागीय कार्यालयात सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून विभागीय रेल्वे कार्यालयाचा परिसर स्वच्छ केला. याप्रसंगी विभागीय व्यवस्थापक दोहरे यांनी स्वच्छतेचे महत्त्व सांगितले, ज्या कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला आणि स्वतःहून स्वतःचा टेबल, कार्यालय परिसर स्वच्छ ठेवला, त्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. काही कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

अनंत चैतन्य प्रशालेत छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन

अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज

सामाजिक परिवर्तनाचे जनक, शिक्षणप्रेमी, दलितोद्धारक, समतेचे प्रणेते, लोकनायक राजा छत्रपती शाहू महाराज यांची शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे साजरी करण्यात आली. प्रारंभी प्रशालेचे प्राचार्य श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रशालेच्या विद्यार्थिनी कु.शिवानी बाळशंकर, कु. लक्ष्मी धर्मसाले, कु.श्रुती बाळशंकर, कु. संगिता धर्मसाले यांची सुंदर भाषणे झाली.

या प्रत्येकांचे क्वायर वही देऊन प्रोत्साहनपर कौतुक करण्यात आले. व प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री. शहाजी माने यांनी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्याविषयी मार्गदर्शन केले. गोरगरीब , दीनदलित, शोषित, उपेक्षितांचा आधार बनून सामाजिक समता स्थापित करणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कार्य शब्दातीत करण्यापलीकडे आहे, असे प्रतिपादन करुन अशा या दृष्टया राजाला संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी अभिवादन केले. याप्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक आदरणीय श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सन्माननिय श्री. सिद्धेश्र्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूर चे उपसरपंच व युवा नेते मा.सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सेमी विभाग प्रमुख सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी ,जेष्ठ शिक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे समस्त शिक्षक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अप्पासाहेब काळे यांनी केले व सुत्रसंचालन सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी केले तर आभार सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांनी मानले.

साकेगांव येथे लोकराजे छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

दैनिक यशसिध्दि न्यूज :

बुलढाणा /प्रतिनिधीः ग्रामपंचात साकेगांव येथे आरक्षणाचे जनक लोकराजे छत्रपती शाहू राजे यांची १५० वी जयंती ग्रामपंचायत कार्यालय साकेगांव येथे सकाळी ८:३० वाजता दीप धूप पुष्पहार अर्पण करून मोठ्या उत्सहात साजरी झाली यावेळी ग्रा. पं. सदस्य देविदास लोखंडे जितु निकाळजे.रो. से. कैलास धोत्रे तं. अध्यक्ष.दरबार परिहार ऑपरेटर असलम शेख अफसर भाई गावातील प्रतिष्ठित नागरिक नारायण इंगळे विष्णू निकाळजे रवींद्र परिहार दुर्गाशिंग जगताप संतोष इंगळे संदीप पालकर आंबादास तायडे विष्णू परिहार प्रकाश परिहार शेख भिकन. इत्यादी. गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

गावातील अवैध दारू बंद न झाल्यास एक जुलैपासून उपोषणाला बसणार

वडगाव माळी येथील महिला एकवटल्या दारूबंदीसाठी उत्पादन शुल्क विभाग व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बुलढाणा/दैनिक यशसिध्दि न्यूज : साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वडगाव माळी येथे जोमात दारू विक्री होत असून त्यामुळे येथील ग्रामपंचायत व महिलांनी आज दिनांक २६ जून रोजी जिल्हा उत्पादन शुल्क विभाग, जिल्हाधिकारी बुलढाणा यांना एका निवेदनाद्वारे गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी यासाठी निवेदन सादर केले आहे .निवेदनात नमन नमूद केल्याप्रमाणे गावातील अवैध दारू विक्री जोमात सुरू असून त्यामुळे अनेक कुटुंब उध्वस्त होत आहेत. तरुण पिढी व्यसनाकडे वळली आहे त्यामुळे याचे दुष्परिणाम लहान मुलावर होत आहे. गावात भांडणाचे प्रमाण वाढले आहे या अगोदरही दारूबंदीसाठी साखरखेर्डा पोलीस स्टेशन व संबंधित विभागाला निवेदन देण्यात आली परंतु आजपर्यंत कुठलीही ठोस कारवाई दारू विक्रेत्यावर करण्यात आली नाही उलट जोमाने दारू विक्री गावात सुरू आहे ही दारू विक्री बंद करण्यात यावी यासाठी वडगाव माळी येथील महिला एक जुलैपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार आहेत तरी संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन गावातील दारू विक्री बंद करण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायत वडगाव माळी , सावंगी माळी सरपंच दत्ता गवई , संगीता गवई, आरती गवई, आम्रपाली गवई, सुमित्रा गवई, निर्मला जाधव, भाग्यश्री राऊत, सरला रोही, शिवानी रोही, अनिता लष्कर, रुक्मिणी जाधव, यांच्यासह अनेक महिला समक्ष जाऊन संबंधित विभागाला निवेदन सादर केले आहे.

श्रावणबाळ, अपंग निराधारांचे मानधन त्वरीत वाटप करा : संदिप गवई यांची निवेदनाद्वारे मागणी

दैनिक यशसिध्दि न्यूज :

बुलढाणा/राहुल साबळे

मेहकर - मेहकर येथे सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांच्या नेतृत्वाखाली मेहकर तहसील कार्यालय येथे मा. तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले आहे की, मागिल तीन महीन्या पासुन गोरगरीब लोकांची निराधार, श्रावणबाळ, अपंग निराधार बंद आसल्यामुळे त्या लाभर्थ्यांना त्वरीत लाभ देण्यात यावे.ज्या लाभर्थ्यांनचे बोगस टिशा लावुन लाभ घेत आहे.आशा लाभर्थ्यांच्या टिशा तपासुन घेण्यात याव्या व बोगस लाभ घेणा-र्यावर कार्यवाही करण्यात यावी.आशी मागणी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या व सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतिने करण्यात येत आहे.कर

रासप महिला जिल्हाध्यक्षा तारामतीताई जायभाये यांच्या तक्रारीला यश

दैनिक यशसिध्दि न्यूज :

बुलढाणा/प्रतिनिधीः तरामतीताई जायभाये ह्या लोणार खरेदी विक्री सहकारी संस्था ला डायरेक्टर आहेत, त्यांच्या कार्यकाळात भ्रष्टाचार होत असल्याचे त्यांना लक्षात आले, त्यांनी वारंवार लोणार, सिंदखेड राजा, बुलढाणा, अकोला, अमरावती, पुणे, मुंबई, मंत्रालय पर्यन्त शासकीय जागा वाचविन्या साठी धावपळ केली, परंतु यश येईना अखेर त्या लोणार तहसीलदार यांच्या कार्यालया समोर तीन दिवशीय उपोषण केल्यानंतर समिती नेमण्यात आली आणि कारवाई साठी गती मिळाली, त्यांनी सहकार संबंधित सर्व ऑफिस ला या शासकीय जागेत भ्रष्टाचार झाल्याचे अधिकारी यांना वारंवार कळवत राहिल्या, त्यातील काही राजकीय,शासकीय अडचणीला त्यांना सामना करावा लागला परंतु त्या हतबल झाल्या नाही,त्यांचवर उपोषण सुटल्यावर पयसे घेऊन म्यानेज झाल्याचे आरोप करण्यात आले, त्यांनी ते सहन केले, पण अखेर सत्य परेशान होत असतो, पराजित नाही. आणि आज संस्थे वर कारवाई करण्याचे अंतिम आदेश ऊऊठ ऑफिस नानासाहेब चव्हाण यांनी काढल्या नंतर त्यांनी सर्वांचे आभार मानले यामध्ये पत्रकार बांधव,पोलीस अधिकारी वर्ग, पंचायत समिती, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, रववश्र कलेक्टर, कलेक्टर,सर्वांचे जायभाये यांनी आभार मानले.

राजधानीत राजर्षि शाहू महाराज जयंती साजरी

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव आणि रक्षाताई खडसे यांनी वाहिली आदरांजली

नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज

सामाजिक समतेचे प्रणेते राजर्षि शाहू महाराज यांची जयंती कस्तुरबा गांधी मार्गावरील महाराष्ट्र सदनाच्या दर्शनी भागात उत्साहात आज साजरी करण्यात आली.कस्तुरबा गांधीस्थित महाराष्ट्र सदनच्या दर्शनी भागात राजर्षि शाहू महाराज यांच्या पुतळ्यास तसेच कॉपरनिकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनच्या सभागृहात शाहू महाराजांच्या प्रतिमेस निवासी आयुक्त रुपिंदर सिंग यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या प्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, श्रीमती रक्षाताई खडसे यांनी राजर्षि शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमात सर्वश्री खासदार छत्रपती शाहू महाराज, सुनील तटकरे, श्रीकांत शिंदे, धैर्यशील माने, श्रीमती वर्षाताई गायकवाड, हेमंत सावरा, रविंद्र वायकर, बळवंत वानखेडे, श्रीमती शोभा बच्छाव, प्रशांत पडोळे यांसह इतर मान्यवरांनीही सहभाग घेतला आणि शाहू महाराजांना अभिवादन केले.यावेळी सहाय्यक निवासी आयुक्त डॉ. राजेश आडपावार , महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी राजर्षि शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.राजर्षि शाहू महाराजांच्या विचारांमुळे भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात सामाजिक सुधारणा झाल्या, असे मान्यवरांनी यावेळी सांगितले. त्यांच्या सामाजिक समतेच्या कार्याचा उल्लेख करून, राजर्षि शाहू महाराजांच्या योगदानामुळे भारतीय समाजात परिवर्तन घडविण्यात मोठी मदत झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

उल्हासनगर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक साहित्य वितरण

दैनिक यशसिध्दि न्यूज

उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव आणि शैक्षणिक साहित्य वितरण समारंभ मंगळवार दिनांक २५ जून, २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका, अभ्यासिका हॉल, उल्हासनगर- ३ येथे उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित अधिकारी मा. डॉ.अझीज शेख, आयुक्त तथा प्रशासक, उ.म.पा. ✻ मा. श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त, उ.म.पा. मा. डॉ. सुभाष जाधव, उप आयुक्त (शिक्षण), उ.म.पा. मा. श्री. दिपक धनगर, प्रशासन अधिकारी (शिक्षण), उ.म.पा. मा. श्रीम, निलम कदम, उप मुख्य लेखाधिकारी, उ.म.पा. मा. श्रीम. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, सदर कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजनाने करण्यात येवून, समारंभा दरम्यानमा. श्री. अजीज शेख. आयुक्त तथा प्रशासक, उ.म.पा. तसेच सर्व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, दप्तर, बूट व मोजे, रेनकोट, लेखन साहित्य, पाण्याची बॉटल तसंच जेवणाचा डब्बा इत्यादी साहित्यांचे मोफत वितरण करण्यात आले.या प्रसंगी मा. श्री. अजीज शेख, आयुक्त तथा प्रशासक, उ.म.पा. यांनी आपले मनोगत व्यक्त करुन विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले व पुढोल वाटचालीकरीता मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत, तसंच उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शाळेतील विद्यार्थ्यांकरीता खालीलप्रमाणे सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात

येत असल्याचे सांगितले: महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ तसेच महाराष्ट्र प्रार्थामक शिक्षण परिषद यांच्यामार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनेनुसार वेगवेगळे उपक्रम / कार्यक्रम महानगरपालिकेच्या शाळेमार्फत राबविण्यात येतात.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत असणाऱ्या सर्वशाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता क्रिडा महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांकरीता निःशुल्क दरवर्षो सहलीचे आयोजन करण्यात येते. ✻ उल्हासनगर महानगरपालिकेतील शाळेमध्ये शैक्षणिक कार्मागरीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याकरीता तसेच डिजिटलाईज पध्दतीने शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्यावर लक्ष ठेवण्याकरीता Teachers Students Monitoring Solution व Teachers Students Performance Analysis Solution या उपक्रमाच्या सहाय्याने प्रायोगिक तत्वावरविविध चार शाळा डिजिटलाईज करण्यात आल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेतील प्रायोगिक तत्वावर विविध पाच शाळा ISO 9001 गुणवत्ता प्रणाली प्रमाणन करण्यात आले आहे. सर्व शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरा व इंटरनेटचीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये डळाशपशरश्र थहशशश्र या उपक्रमाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांकरीता पोषक तथा आनंदी शैक्षणिक वातावरण निर्माण होण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकांचे मुल्यांकन व कार्याशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

पंढरपूर सिंहगडच्या शुभम सद्गुले यांची तीन कंपनीत निवड

पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज

तालुका पंढरपूर कोर्टी येथील एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग या विभागातील विद्यार्थी शुभम सदगीर हा शेवटच्या वर्षांमध्ये शिक्षण घेत आहोत तीन नामांकित कंपनीत मुलाखती दिल्या होत्या या तिन्ही कंपनीत शुभम विनायक सादगिले यांची कॅम्पस मुलाखतीतून निवड झाली असल्याची माहिती कॉम्प्युटर सायन्स ऑफ इंजीनियरिंग विभाग प्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांनी दिली

देशातील व परदेशातील नामांकित कंपन्या आवश्यक असलेले परफेक्ट इंजिनिअरिंग हे पंढरपूर सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पाठवले जातात कंपनीला आवश्यक असलेली ज्ञान गुण यांचा समन्वय साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पद्धतीने शिक्षण व प्लेसमेंट ची तयारी करून घेते त्यामुळे पंढरपूर सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थी मुलाखती घेण्यासाठी सक्षम होऊन यशस्वी होत आहेत चालू शैक्षणिक वर्षात कॉम्प्युटर सायन्स ऑफ इंजीनियरिंग विभागातील चतुर्थ वर्षात शिक्षण घेत असेल स्थानात शुभम विनायक सादगिरे यांची क्वालिटी किसको (वार्षिक पॅकेज ५.३० लाख,) अशा तीन कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड झाली असून पुणे येथील एमडॉक्स बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत सेवा प्रददा आणि डिजिटल सॉफ्टवेअर साठी अशा कंपनीमध्ये २०२४ मध्ये रुजू होणार असल्याची शुभम साधिकेले यांनी सांगितले

शुभम शादी के लिए यांच्या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे उप प्राचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉक्टर समीर कटेकर डॉक्टर चेतन पिसे डॉक्टर गोडबोले डॉक्टर श्याम कुलकर्णी डॉक्टर अल्ताफ मुलानी डॉक्टर श्री कारंडे संजय देशमुख डॉक्टर बाळासाहेब गांधरे डॉक्टर आराध्य डॉक्टर सोमनाथ कोळी डॉक्टर सुभाष पिंगळे प्राध्यापक अभिजीत सव्वाशे प्रा संदीप भिंगे आधी सह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

कोर्टी येथील रस्त्याचे महेश साठे यांच्या हस्ते भूमिपूजन

पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज

कोर्टी तालुका पंढरपूर येथील मुसलमान एडगे वस्ती ते जुम्मा शेख वस्ती मुसलमान वस्ती ते लायकाली शेख वस्ती या ठिकाणच्या रस्त्याची भूमिपूजन जिल्हा नियोजन समितीचे सदस्य महेश साठे यांच्या हस्ते करण्यात आले या रस्त्यामुळे या ठिकाणच्या लोक वस्तीवरील पाचशे लोकांची सोय झाली आहे कित्येक वर्षाची होणारी गैरसोय हा रस्ता झाल्यामुळे थांबणार आहे रस्त्यासाठी जिल्हा नियोजन फंडातून जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख (शिंदे शिवसेना) महेश नाना साठे या दोन रस्त्यासाठी प्रत्येकी दहा लाख रुपये त्यांच्या निधीतून मंजूर केले आहेत गेले दोन वर्षांमध्ये महेश साठे यांनी टाकळी व कोर्टी गादेगाव भवाळी उंबरगाव सोनकी तपकिरी शेटफळ या गावांना विकास निधी देण्याची भूमिका आगरक्रमाने घेतली आहे या भूमिपूजन प्रसंगी कोर्टी गावचे सरपंच राजाभाऊ पवार माजी उपसरपंच तथा सदस्य महेश शेडगे ग्रामपंचायत सदस्य बबलू शेख रफिक भाई शेख इस्माईल शेख असलम शेख विजय काळे हरून मुजावर अन्वर मुजावर सोहेल मुजावर मोहम्मद शेख राजाबाई शेख आदी ग्रामस्थ मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील रस्त्याच्या कामाचे उद्घाटन

दैनिक यशसिध्दि न्यूज

पंढरपूर /प्रतिनिधीः पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील भगवती नगर येथील दत्त चौक ते श्री हनुमान मंदिरापर्यंत रस्त्याच्या कामाचे उद्घाटन माजी नगरसेवक अक्षय गंगेकर यांच्या उपस्थितीत परिसरातील जेष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक एक आणि परिसरातील प्रभागांमध्ये अनेक वर्षांपासून गंगेकर कुटुंब प्रतिनिधित्व करत आहे. सध्या प्रभाग क्रमांक एकचे प्रतिनिधित्व अक्षय गंगेकर यांच्याकडे आहे. त्यांच्या कार्यकाळात प्रभागात पायाभूत सुविधा रस्ते,पाणी,रोडलाईट, ड्रेनेज लाईनची कामे नगर परिषदेच्या माध्यमातून मोठी प्रमाणावर झाली आहेत.नगर परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुका न झाल्याने गेली दोन वर्षाहून अधिक काळापासून पंढरपूर नगरपालिकेवर प्रशासक आहे. तरी देखील गंगेकर यांनी पाठपुरावा करून अधिकाऱ्यांशी संपर्क साधून विकास कामे झाली पाहिजे अशी भूमिका घेऊन विकास कामावर भर दिल्याने त्यांच्या या कार्याचे कौतुक सर्वत्र होत आहे.

संत कक्कय्या समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी मुबंईत २८जूनला राज्यव्यापी आंदोलन!

पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज

प्रगत शहरात ढोर वाडा, चांभार वाडा नावाने संबोधल्या जाणाऱ्या कक्कय्या समाजाला आजही मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले गेले. त्याच्या विकासासाठी स्वतंत्र संत कक्कया आर्थिक विकास महामंडळ हवे, या प्रमुख मागणीसाठी वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळाच्या नेतृत्वाखाली कक्कय्या समाजाने आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

मंगळवारी मुंबई मराठी पत्रकारसंघात वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळाचे अध्यक्ष महादेव शिंदे, सचिव यशवंत नारायणकर, रविंद्र शिंदे, सूर्यकांत इंगळे, विश्र्वनाथ शिंदे, बबन सोनवणे, नंदादीप शिंदे, गोविंद खरटमोल,पत्रकार दत्ता खंदारे यांनी माध्यमांशी संवाद साधला.राज्य सरकारने गेल्या वर्षी लिंगायत, गुरव, रामोशी, वडार या चार समाजाची महामंडळे निर्माण केली. मात्र २५ जुलै २०२३ रोजी कक्कय्या ढोर समाजासाठी स्वतंत्र महामंडळाचा प्रस्ताव आम्ही सादर केला आहे. आमदार ज्ञानराज चौगुले यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली.

त्यावर चर्चा झाली. तरी सुद्धा कक्कय्या ढोर महामंडळाच्या प्रस्तावाची दखल घेतली जात नाही.त्यामुळे येत्या २८जून रोजी पावसाळी अधिवेशनाच्या पाश्र्ववभूमीवर आझाद मैदान येथे कक्कय्या ढोर समाज राज्यव्यापी आंदोलन करणार आहे. येत्या अधिवेशात आम्हाला न्याय मिळाला नाही, तर आगामी विधानसभेत आम्ही योग्य धडा शकवू, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष महादेव शिंदे यांनी दिला आहे.-ढोर समाजाची राज्यात ३०० तालुक्यात परिस्थिती हलाखीची आहे.वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळाने राज्यात ३००हुन अधिक तालुक्यांतील कक्कय्या ढोर कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. त्याची जनगणना केली आहे. त्यानुसार राज्यात जवळपास १० लाखांपेक्षा जास्त कक्कय्या ढोर समाज आहे. मात्र त्याची स्थिती अजूनही मागास आहे. ७८ टक्के कुटुंब प्रमुख मजुरी करतात. त्याचे वार्षिक उत्पन्न १ लाख पेक्षा कमी आहे. १२ टक्के कुटुंब किरकोळ फुटपाथवर व्यवसाय करतात. त्याचेही वार्षिक उत्पन्न २ लाख नाही. शिक्षण नसल्याने आरक्षणाचा लाभ नाही. अशी दारुण अवस्था कक्कय्या ढोर समाजाची असल्याचे संस्थेचे प्रवक्ते रविंद्र शिंदे यांनी सांगितले.

बँकरुपी लावलेले रोपटे तोडणाऱ्यांची संख्या जास्त : ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर

पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज

एखादा व्यक्ती समोर लहानसे रोपटे लावण्याचा प्रयत्न करतो कारण लहानशा रोपट्याची मोठ्या वृक्षांमध्ये रूपांतर होऊन या झाडाखाली थांबणाऱ्याला सावली लागणार असतील त्याचप्रमाणे फुले फळे लागणार असतील परंतु आमच्या लहानशा रोपट्याला तोडण्याची काम काही विघ्न संतोषी लोक करीत असतात तसेच सध्याच्या जगामध्ये सर्वत्र स्पर्धा वाढलेले आहेत बँकिंग क्षेत्रामध्ये देखील स्पर्धा या वाढलेल्या असून अशा या बँक रुपीस रोपट्याला तोडण्याचे काम काही मंडळी करीत असतात परंतु त्या लहानशा रोपट्यांची झोपलो करून त्याला वाढवण्याचे प्रयत्न काही लोक करतात आणि ते झाड मोठी होऊन सर्वांना सावली देऊ लागते या बँक रुपये रोपट्याला मोठ्या झाडांमध्ये रूपांतर करण्याचे कार्य आधी माझी संचालक मंडळांनी केलेले आहे त्याचप्रमाणे कर्मचारी यांना देखील येथे केले जाते अशा प्रकारच्या उदाहरणापासून ह भ प घेण्यात महाराज औसेकर दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेच्या सातव्या नवीन शाखेचे उद्घाटन इसबाव येथे करीत असताना या प्रसंगी आपली मनोगत व्यक्त केली. पंढरपूर मर्चंट बँकेची १९६१ सालच्या स्थापनेपासून ते आतापर्यंतच्या सर्व संचालक मंडळांनी पंढरपूर मर्चंट बँकेच्या प्रगतीस व वाढीस हातभार लावलेला आहे दि पंढरपूर मर्चंट कॉपरेटिव्ह बँक शहरातील व्यापारी शेतकरी कष्टकरी शिक्षक लघु उद्योजक करणारे उद्योजक यांना आर्थिक मदत करण्याचा उद्देशाने व लोकांचे आर्थिक परिस्थिती बळकट करण्याच्या उद्देशाने बँक कार्यरत आहे ११००० च्या संख्येने असलेले सभासद ठेविदार यांच्या विश्वासात पात्र ठरलेली ही बँक आहे माझी चेअरमन नागेश काका भोसले आणि बँकेला प्रगती पथावर आणण्याचे मर्चंट बँकेचे संचालक मंडळ कर्मचारी हे सभासदांच्या व बँकेच्या ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असतात पंढरपूर मर्चंट बँकेची शाखा या संपूर्ण जिल्ह्यामध्ये व्हावेत व जिल्ह्याच्या बाहेर देखील पंढरपूर मध्ये बँकेच्या शाखा व्हाव्यात अशी शुभेच्छा महाराजांनी आज इसबावी येथील नवीन शाखेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केली.